# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/10/2023 (सोमवार) दुपार

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत मौजा भुरका नाला वस्ती काटोल येथे फिर्यादी नामे— अतुल शामरावजी सनेशर, वय ३४ वर्ष, रा. भुरका नाला वस्ती काटोल ता. काटोल जि. नागपुर यांनी आपल्या काटोल येथील राहत्या घरासमोर दिनांक २१/१०/२०२३ रोजी २३/३० वा. दरम्यान त्यांचे मालकीची ॲक्टीवा गाडी क्र. एम. एच. ४०/सी. एस.— १३२० किंमती ६५०००/— रू. घरासमोर हॅंडल लॉक करून ठेवली होती. फिर्यादीने दिनांक २२/१०/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा. पाहीले असता ॲक्टीवा गाडी क्र. एम. एच.— ४०/सी. एस.— १३२० दिसुन आली नाही तसेच आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही, ती ॲक्टीवा गाडी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवन वाघमारे मो. नं. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ किमी अंतरावर वार्ड नं ०३ शिक्षक कॉलोनी टाकळघाट येथे फिर्यादी नामे— विजय नामदेव वराठे, वय ४७ वर्ष रा. वार्ड नं. ०३ शिक्षक कॉलोनी टाकळघाट हिंगणा जि. नागपूर यांनी स्वत:चा मुलगा नामे— खेमराज विजय वराठे याला सन २०२१ मध्ये यामाहा आर १५ मॅट ब्लॅक रंगाची क्र. एम एच. ४०/सी जी.— ११५९ मोटरसायकल किंमती ६०,०००/— रू. विकत घेवुन दिली होती फिर्यादी यांचा पुतण्या नामे —वैभव राजु वराठे याने सदर मोटरसायकल हि घरासमोर लॉक लावुन उभी केली होती रात्री ००/१० वा. च्या दरम्यान बघीतली असता मोटरसायकल तिथेच होती त्यानंतर सकाळी ०५/०० वा. दरम्यान बघीतली असता दिसुन आली नाही. सदरची मोटरसायकल यामाहा आर १५ मॅट ब्लॅक रंगाची क्र. एम एच.—४०/सी जी— ११५९ किंमती ६०,०००/— रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राय हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर